# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-32
# नागपूर महानगरपालिका, नागपूर
# सार्वत्रिक निवडणूक 2025-26
# राजकीय पक्ष व उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे अधिपत्त्याखाली महानगरपालिकेची बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीने निवडणूक होत आहे. अनेक राजकीय पक्षांचे, आघाडी / फ्रंटचे व अपक्ष उमेदवार निवडणूकीमध्ये उभे राहण्यास इच्छूक असतात. निवडणूकीस इच्छूक उमेदवारांचे माहितीसाठी ही पुस्तिका प्रसिद्ध करण्यात येत आहे. निवडणूकीचे कामकाज कशाप्रकारे पार पाडले जाणार आहे याची थोडक्यात माहिती देणेत येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी महानगरपालिकेसाठी एकूण ३८ प्रभाग व सदस्य संख्या (जागा ) १५१ निश्चित केल्या आहेत. बहुसदस्यीय पध्दतीमुळे ३७ प्रभागातून निवडून द्यावयाच्या ४ जागा (अ/ब/क/ड) व एक प्रभागातून निवडून दयावयाची ३ जागा (अ/ब/क) असून प्रत्येक जागेमधून एकच उमेदवार निवडून द्यावयाचा आहे. सार्वत्रिक निवडणूकीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे निवडावयाचे सभासदांची संख्या (जागा) अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरिकांचा मागास वर्ग व स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

**सदस्य संख्या व आरक्षणचे एकत्रित विवरणपत्र)**

**महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक सन २०२५-२६**

| अ. क्र. | नवीन प्रभागाचा क्रमांक | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जाती लोकसंख्या | अनुसूचित जमाती लोकसंख्या | जागा क्रमांक | | | | महिलांसाठी जागेचे आरक्षण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | 1 | 69790 | 21823 | 1520 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | महिला | महिला | |
| 2 | 2 | 69465 | 36315 | 1993 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | महिला | | महिला | |
| 3 | 3 | 64371 | 9652 | 5005 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | | | महिला | महिला |
| 4 | 4 | 60949 | 9183 | 3932 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | महिला | | महिला | |
| 5 | 5 | 68482 | 13105 | 12768 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | महिला | | महिला | |
| 6 | 6 | 63959 | 21214 | 3854 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | महिला | | महिला | |
| 7 | 7 | 63370 | 29680 | 4134 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | महिला | | महिला | |
| 8 | 8 | 70472 | 5133 | 9746 | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | महिला | | महिला | |
| 9 | 9 | 60703 | 27494 | 2665 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | महिला | महिला | |
| 10 | 10 | 59260 | 8129 | 4876 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | महिला | | महिला | |
| 11 | 11 | 71151 | 8935 | 3231 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | महिला | महिला | |
| 12 | 12 | 59756 | 10059 | 4296 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | महिला | | महिला | |
| 13 | 13 | 62882 | 15143 | 5666 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | | महिला | महिला | |
| 14 | 14 | 60771 | 11613 | 5468 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | महिला | महिला | | |
| 15 | 15 | 62432 | 6895 | 3383 | ना.मा.प्र. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | महिला | | महिला | |

| परिशिष्ट ४ (सदस्य संख्या व आरक्षणचे एकत्रित विवरणपत्र) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक सन २०२५ - २६ | | | | | | | | | | | | |
| अ. क्र. | नवीन प्रभागाचा क्रमांक | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जाती लोकसंख्या | अनुसूचित जमाती लोकसंख्या | जागा क्रमांक | | | | महिलांसाठी जागेचे आरक्षण | | | |
| | | | | | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 16 | 16 | 71187 | 9265 | 4016 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 17 | 17 | 70678 | 28212 | 2336 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 18 | 18 | 66652 | 7037 | 2881 | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 19 | 19 | 59718 | 3326 | 4119 | ना.मा.प्र. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 20 | 20 | 68728 | 8398 | 29237 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 21 | 21 | 63364 | 5233 | 9487 | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 22 | 22 | 69001 | 7444 | 12460 | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 23 | 23 | 63471 | 10044 | 2360 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 24 | 24 | 61732 | 12052 | 2846 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 25 | 25 | 66076 | 8652 | 4249 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 26 | 26 | 59642 | 10281 | 3369 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 27 | 27 | 66828 | 7473 | 3277 | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 28 | 28 | 59456 | 5563 | 3796 | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 29 | 29 | 62343 | 8041 | 4315 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 30 | 30 | 63564 | 7466 | 2475 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 31 | 31 | 64092 | 9405 | 2410 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | | **महिला** | **महिला** |
| 32 | 32 | 68711 | 10215 | 2885 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 33 | 33 | 67572 | 26736 | 2431 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | | **महिला** | **महिला** |
| 34 | 34 | 65506 | 13078 | 5895 | अ.जा. | अ.ज. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 35 | 35 | 60871 | 16487 | 3554 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 36 | 36 | 70209 | 8933 | 2603 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | | **महिला** | **महिला** | |
| 37 | 37 | 63064 | 11607 | 2907 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | सर्वसाधारण | **महिला** | | **महिला** | |
| 38 | 38 | 47216 | 11438 | 1999 | अ.जा. | ना.मा.प्र. | सर्वसाधारण | - | | **महिला** | **महिला** | |

- ज्या प्रवर्गासाठी प्रभागातील जागा राखीव असतील त्या जागेमधून संबंधित प्रवर्गातील उमेदवारच निवडणूक लढविण्यास पात्र राहतील.
- सर्वसाधारण खुला गट ३४ जागा असुन कोणत्याही मतदाराला ( स्त्री / पुरुष ) उमेदवार म्हणून उभे राहता येईल.
- सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखीव असलेल्या जागांवरुन फक्त स्त्री मतदारांनाच निवडणूक लढविता येईल.
- किन्नरांकरिता स्वतंत्र प्रभाग अथवा जागा आरक्षीत ठेवण्याची तरतूद नाही. तथा, मतदार यादीमध्ये किन्नर असलेल्या मतदारांच्या नावासमोर जे लिंग नमुद केले असेल त्यानुसार त्यास प्रभागातील आरक्षीत किंवा खुल्या ( सर्वसाधारण ) प्रभागातील जागेतून निवडणूक लढविता येईल.

**निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये :-**

नागरिकांच्या सोईचे दृष्टीने निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये खालील ठिकाणी सुरु करणेत आली आहेत. इच्छुक उमेदवारांनी संबंधित प्रभागांची नामनिर्देशनपत्रे त्यांचे विभागासाठी नेमणेत आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातून घ्यावीत व दाखल करावीत.

| अ.क्र | निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी | नामनिर्देशन पत्र वाटप, स्विकृती इ. कार्यवाही करण्याचे ठिकाण | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | १) श्री. सुरेश बगळे, उप विभागीय अधिकारी, नागपूर शहर<br>२) श्री. अखिलभारत मेश्राम, तहसिलदार, सं.गा.यो. (नागपूर-जिल्हा), जि.का. नागपूर<br>३) श्री. धनंजय जाधव सहा. आयुक्त, झोन क्र. १, मनपा, नागपूर | झोन क्र. १ लक्ष्मीनगर झोनल कार्यालय लक्ष्मीनगर पाण्याच्या टाकीजवळ, लक्ष्मीनगर, नागपूर | १६, ३६, ३७, ३८ |
| २ | १) श्रीमती इंदिरा चौधरी, उपजिल्हाधिकारी, (राजशिष्ठाचार), नागपूर<br>२) श्री. संतोष खांडरे, तहसिलदार, नागपूर (शहर)<br>३) श्री. राजकुमार मेश्राम सहा. आयुक्त, झोन क्र. २, मनपा, नागपूर | झोन क्र. २ धरमपेठ झोनल कार्यालय : हर्णे महिला समाजच्या मागे, गोकुलपेठ बाजार जवळ गोकुलपेठ, नागपूर | १२, १३, १४, १५ |
| ३ | १) श्री. प्रदिप शेलार, उपजिल्हाधिकारी, (भुसंपादन क्र.२ विपाविम), नागपूर<br>२) श्रीमती रोहिणी पाठराबे, अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा<br>३) श्री. नरेंद्र बावनकर सहा. आयुक्त, झोन क्र. ३, मनपा, नागपूर | झोन क्र. ३ हनुमाननगर झोनल कार्यालय :<br>संत तुकडोजी पुतळा चौक, जवाहर नगर, नागपूर | २९, ३१, ३२, ३४ |
| ४ | १) श्री. प्रियेश महाजन, उप विभागीय अधिकारी, रामटेक, जिल्हा-नागपूर<br>२) श्रीमती कौशल्याराणी पाटील, तहसिलदार, (पुर्नवसन) जि.का. वर्धा<br>३) श्री. प्रमोद वानखेडे सहा. आयुक्त, झोन क्र. ४, मनपा, नागपूर | झोन क्र. ४ धंतोली झोनल कार्यालय : ग्रेट नागरोड, रेल्वे अंडरब्रिज जवळ, धंतोली, नागपूर | १७, ३३, ३५ |
| ५ | १) श्री. अमोल कुंभार, उपजिल्हाधिकारी (भू.) विपाविम क्र. २, भंडारा<br>२) श्री. सतिश साळवे, तहसिलदार, पवनी, जिल्हा भंडारा<br>३) श्री. विकास रायबोले सहा. आयुक्त, झोन क्र. ५, मनपा, नागपूर | झोन क्र. ५ नेहरूनगर झोनल कार्यालय नेहरूनगर उद्यानाच्या जवळ, नेहरूनगर, नागपूर | २६, २७, २८, ३० |
| ६ | १) श्री. श्रीराम मुदंडा,महाव्यवस्थापक, (ना.सु.प्र.), नागपूर<br>२) श्री. वैभव पवार, तहसिलदार, लाखांदूर, जिल्हा भंडारा<br>३) श्री. घनश्याम पंधरे सहा. आयुक्त, झोन क्र. ६, मनपा, नागपूर | झोन क्र. ६ गांधीबाग झोनल कार्यालय : साने गुरूजी शाळा, दसरा रोड, राहातेकरवाडी, महाल, नागपूर | ०८, १८, १९, २२ |
| ७ | १) श्री. संपत खलाटे, उप विभागीय अधिकारी, सावनेर, जिल्हा-नागपूर<br>२) श्रीमती शितल घावटे, तहसिलदार, लाखनी, जिल्हा भंडारा<br>३) श्री. हरीष राऊत, सहा आयुक्त, झोन क्र. ७ मनपा. नागपूर | झोन क्र. ७ संतरजीपूरा झोनल कार्यालय :<br>इतवारी रेल्वे स्टेशन, मारवाडी चौक, नागपूर | ०५, २०, २१ |
| ८ | १) श्री. मलिक विराणी, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र. १ विपाविम), नागपूर<br>२) श्रीमती प्राजक्ता बुरांडे, तहसिलदार, मोहाडी, जिल्हा भंडारा<br>३) श्री. विजय थूल सहा. आयुक्त, झोन क्र. ८, मनपा, नागपूर | झोन क्र. ८ लकडगंज झोनल कार्यालय काबरा पेट्रोल पंपच्या मागे, टेलीफोन एक्सचेंज चौक, नागपूर | ०४, २३, २४, २५ |
| ९ | १) श्री. अजित पाटील, वनजमाबंदी अधिकारी, नागपूर<br>२) श्रीमती विनिता लांजेवार, तहसिलदार, (सामान्य), जि.का. वर्धा<br>३) श्री. गणेश राठोड उपायुक्त तथा सहा. आयुक्त, झोन क्र. ९, मनपा, नागपूर | झोन क्र. ९ आसी नगर झोन आनंद बुध्द विहार जवळ, कामठी रोड, नागपूर | ०२,०३,०६,०७ |
| १० | १) श्री. विवेक साळुंके,उपजिल्हाधिकारी (भुसंपादन पी.पी १), नागपूर<br>२) श्री. गणेश दिघे परि. उपजिल्हाधिकारी, सध्या तहसिलदार पदावर प्रशिक्षणाकरिता नेमणूक, भंडारा जिल्हा (तहसिल कार्यालय), तुमसर<br>३) श्री. अशोक गराटे उपायुक्त तथा सहा. आयुक्त, झोन क्र. १०, मनपा, नागपूर | झोन क्र. १० मंगळवारी झोन छावणी, पोलिस चौकी जवळ, छिंदवाडा रोड, नागपूर | ०१,०९,१०,११ |

# निवडणूक कार्यक्रम - २०२५

## परिशिष्ट — २

### २९- महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम — २०२५-२६

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५, दि १५/१२/२०२५ सोबतचे पत्र)

| अ. क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू अथवा पुर्ण करण्याचा दिनांक |
| --- | --- | --- |
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दि. ०१ जुलै, २०२५ (मंगळवार) |
| १ | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | दि. १८ डिसेंबर, २०२५ (गुरुवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. २९ डिसेंबर, २०२५ (सोमवार)<br>(सकाळी ११ ते दुपारी ३)<br>दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी २)<br>(गुरुवार दि.२५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि. २८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत) |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी ३)<br>(गुरुवार दि.२५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि.२८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | ३१ डिसेंबर, २०२५ (बुधवार)<br>(सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि. ०२ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) पर्यंत<br>(सकाळी ११ ते दुपारी ३) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार)<br>(सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि. १५ जानेवारी, २०२६ (गुरुवार)<br>(सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि. १६ जानेवारी, २०२६ (शुक्रवार)<br>(सकाळी १०.०० वाजल्यापासून) |
| ११ | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दि. १९ जानेवारी, २०२६ (सोमवार) पर्यंत |

❖ खालील महत्वाच्या सूचना आपण काळजीपूर्वक वाचाव्यात म्हणजे आपणांस शक्यतो कोणत्याही गोष्टीची अडचण निर्माण होणार नाही.

**मतदार यादी :-**

मा.राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५ /प्र.क्र.४१/का-५, दि.०९/१०/२०२५ चे पत्रान्वये दि. २१/०८/२०२५ च्या अधिसुचनेन्वये दि.०१ जुलै २०२५ या दिवशी अस्तीत्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभा मतदार याद्या, या आदेशाच्या दिनांकापासून होणाऱ्या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकांकरीता मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसुचीत करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने दि.०१ जुलै २०२५ या दिवशी अस्तीत्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभा मतदार निहाय यादीचे प्रभागनिहाय विभाजन करुन तयार करण्यात आली आहे.

तसेच, नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ https://www.nmcnagpur.gov.in वर मतदार यादी, मतदान केंद्राची यादी व निवडणूक विषयक अनुषंगीक माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**१) नामनिर्देशनपत्र :-**

**अ) पारंपारिक पध्दतीने (Offline) नामनिर्देशन पत्र भरणे :-**

या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची प्रक्रिया पारंपारिक पध्दतीने (Offline) होणार असून छापील नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. दृढकथन करुन व स्वाक्षरी करुन आवश्यकतेनुसार सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून ते निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे विहित वेळेत व विविध पध्दतीने सादर करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**ब) नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावयाचे कागदपत्रे :-**

१. विहीत नमुन्यातील नामनिर्देशन पत्र
२. शपथपत्र
३. राखीव जागेसाठी अर्ज असल्यास – महाराष्ट्र राज्यातील सक्षम अधिकारी यांचेकडील जातीचा दाखला
४. जातवैधता प्रमाणपत्र
५. जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास: -
  **अ)** वैधता समितीकडे पडताळणी अर्ज केल्याची पोच पावती
  **ब)** निवडणूक भूतलक्षी प्रभावाने रद्द करणेबाबतचे हमीपत्र.
६. उमेदवार दुसऱ्या प्रभागातील असल्यास संबधीत प्रभागातील मतदार नोंदीची प्रमाणीत प्रत.
७. अनामत रक्कम पावती
८. उमेदवार राजकीय पक्षाचा असल्यास - जोडपत्रे 1 व 2
९. महानगरपालिका थकबाकी नसलेचा दाखला.

**क) नामनिर्देशनपत्रे दाखल करणे :-**

१) ज्या नागरिकांचे नाव मतदार यादीत नोंदले आहे तथापी, नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याचे दिवशी ज्याच्या वयाची 21 वर्षे पुर्ण झाली आहेत अशा व त्यावरील वयाच्या इच्छुक उमेदवारास जास्तीत जास्त चार (4) नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील.
२) उमेदवार ज्या प्रभागातून आपले नामनिर्देशनपत्र दाखल करणार आहे त्याच प्रभागातील मतदार प्रस्तावक व अनुमोदनकर्ता असणे आवश्यक आहे.
३) प्रत्येक जागेसाठी वेगवेगळी नामनिर्देशनपत्रे भरणे आवश्यक राहील.
४) बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमध्ये 1 उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यावर बंदी असणार नाही.
५) एका जागेसाठी एका व्यक्तीकडून जास्तीत जास्त चार (4) नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येतील.

६) इच्छुक उमेदवारांनी पारंपारिक पध्दतीने (offline) नामनिर्देशनपत्र दाखल करणे जरुरी आहे व मतदार यादीत ज्याप्रमाणे नाव (प्रथम आडनाव, नाव, वडील / पतीचे नाव) व इतर माहिती असेल त्याचप्रमाणे नामनिर्देशनपत्र भरणे जरुरी आहे.

७) विवाहीत स्त्रियांसाठी मतदार यादीत जसे नाव असेल त्याप्रमाणेच नामनिर्देशन भरावे, मतपत्रिकेवर वेगळ्या पध्दतिने (लग्नापुर्वी / लग्नानंतरचे) नाव छापावयाचे असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावे आवश्यक पुरावेसह तसे कळविणे आवश्यक आहे.

८) नामनिर्देशनपत्राबरोबर उमेदवाराने रोख अनामत रक्कम भरलेली महानगरपालिकेची मुळ पावती जोडणे जरुरीचे आहे. मात्र अशा पावतीचा क्रमांक, दिनांक अथवा झेरॉक्स प्रत आपले माहितीसाठी जपून ठेवावी.

९) इच्छुक उमेदवारांनी बिनचूक पूर्ण भरलेली नामनिर्देशनपत्रे, शपथपत्र व कागदपत्रांसह संबंधित प्रभागाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडेच नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या दिनांकास व वेळेमध्येच दाखल करणे जरुरीचे आहे. (दिनांक 23/12/2025 ते 30/12/2025 सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 वाजेपर्यंत मात्र दि.25/12/2025 व 28/12/2025 रोजी साप्ताहिक सुट्टी असलेने नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत.)

- **राखीव जागांवरील उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र :-**

उमेदवार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या प्रभागातून निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्रे दाखल करीत असेल तर उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत संबधित कागदपत्रे व शपथपत्रासह जातीच्या दाखल्याची प्रत, जातवैधता प्रमाणपत्र प्रत, जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास वैधता समितीकडे पडताळणी अर्ज केल्याची पोहोच पावती, निवडणूक भूतलक्षी प्रभावाने रद्द करणेबाबतचे हमीपत्र या कागदपत्रांच्या झेरॉक्सप्रती सादर केल्या पाहिजेत व छाननीचे वेळी मुळ प्रमाणपत्र सादर केली पाहीजेत.

- **शपथपत्र :-** मा.राज्य निवडणूक आयोगाने विविध बाबींसाठी विहित केलेले शपथपत्र तसेच हमीपत्राचे नमूने एकत्रित करून शपथपत्राचा सर्वसमावेशक असा एकच नमूना अनूसूची 2 मध्ये सुधारित केलेला आहे त्यानुसार ऑफलाईन पध्दतीने शपथपत्र भरून असे शपथपत्र नामनिर्देशन पत्रासोबत दाखल करावयाचे आहे. सदरचे शपथपत्र प्रथमवर्ग दंडाधिकारी, ओथ कमिशनर, नोटरी पब्लिक किंवा शपथपत्र देण्यासाठी सक्षम असलेले प्राधिकारी यांचेपुढे करावे लागेल.

ड) **उमेदवार माहिती पुस्तिका :-** निवडणूक कार्यक्रम २०२५, आचारसंहिता, नामनिर्देशनपत्र, शपथपत्र, निवडणूक खर्चाबाबत सादर करावयाची विवरणपत्रे व शपथपत्र, मतपत्रिकेवर छापावयाचे नावाचा फॉर्म, उमेदवारी मागे घेण्यासंबंधीचे सूचनापत्र व उमेदवार प्रतिनिधी / मतदान प्रतिनिधी / मतमोजणी प्रतिनिधी नेमणूकांचे पत्र, निवडणूक चिन्हांचा तक्ता इत्यादी अर्ज व फॉर्म इ. संदर्भात माहिती असलेली पुस्तिका रक्कम रुपये १०० /- भरल्यानंतर दिले जातील.

उमेदवार माहिती पुस्तिका व विविध नमूने निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात उमेदवारांना उपलब्ध करून घेता येतील.

**२) अनामत रक्कम :-**

अ) प्रत्येक जागेसाठी इच्छुक उमेदवारास अनामत रक्कम संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे रोख भरावी लागेल.

- सर्वसाधारण जागेतील उमेदवारासाठी रक्कम रुपये 5,000/- व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / नागरिकांचा मागासवर्ग व स्त्रियांसाठी या राखीव जागेतील उमेदवारांसाठी रक्कम रुपये 2,500/- याप्रमाणे निश्चित केली आहे.
- प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरणे आवश्यक राहिल.
- एकाच जागेसाठी एक अथवा एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे स्विकारताना अनामत रक्कम एकदाच स्विकारण्यात येईल.

एकापेक्षा अधिक प्रभागामध्ये नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची इच्छा असल्यास त्यास प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

ब) जर एखादा उमेदवार एकापेक्षा अधिक प्रभागातील जागामंध्ये रितसर नामनिर्देशित झाला असेल तर त्याने किंवा त्याच्या वतीने दिलेल्या अनामत रकमांपैकी एकाहून अधिक अनामत रकमा परत करण्यात येणार नाहीत.

क) इच्छुक उमेदवारांना नामनिर्देशनपत्रे दाखल करावयाचे दिनांक 23/12/2025 ते अंतिम दि.30/12/2025 – सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 वाजेपूर्वी ( दि.25/12/2025 व 28/12/2025 रोजी साप्ताहिक सुट्टी असलेने अनामत रक्कम भरता येणार नाही) अनामत रक्कम भरता येईल. त्यावेळे व्यतिरिक्त अनामत रक्कम स्विकारली जाणार नाही.

**३) कायद्यातील तरतूदी :-**

नामनिर्देशनपत्र दाखल करणेचे संदर्भातील वरील महत्वाच्या सूचनांव्यतिरिक्त इच्छुक उमेदवारांनी ज्यादा माहितीसाठी मा. राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 1 मधील निवडणूक नियम क्रमांक 9 व 10 पहावेत.

**४) निवडणूक चिन्हांबाबत :-**

उमेदवारांना चिन्हे वाटप "महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी विनियम निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २०२५ नुसार केल्या जाईल.

1) संबंधित नोंदणीकृत पक्ष, फ्रंट व आघाडी यांनी त्यांचे अधिकृत उमेदवारांची नावे कळविणेकामी ज्या व्यक्तीस अधिकार प्रदान केले आहेत त्याबाबतची लेखी सूचना जोडपत्र-1 मध्ये संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे नामनिर्देशनपत्रे दाखल करणेचे दिवशी व वेळेत अथवा त्यापूर्वी देणे जरुरीचे आहे.

2) तसेच ज्या व्यक्तीस, अधिकृत उमेदवारांची नावे कळविणेबाबत अधिकार दिलेले आहेत त्या व्यक्तींना स्वतंत्रपणे जोडपत्र-2 मध्ये प्रत्येक प्रभागासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांना नामनिर्देशपत्र दाखल करण्याच्या अंतिम दिवसापर्यंत दुपारी 3.00 वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्रासोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळविली पाहिजे.

3) उक्त सुचना पत्रावर पक्षाचे अध्यक्ष, सचिव किंवा अधिकृत केलेल्या पदाधिकाऱ्याने शाईने किंवा बॉलपेनने स्वाक्षरी केलेली असेल तसेच फॅक्सने अगर अन्यप्रकारे सुचनापत्र पाठविता येणार नाही.

4) प्रभागातील एकाच जागेसाठी एकापेक्षा अनेक उमेदवारांना पक्षातर्फे जोडपत्र - 1 व जोडपत्र - 2 देण्यात येतील. त्यावेळी जर त्या पक्षाने उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी 3.00 वाजेपर्यंत नेमक्या कोणत्या उमेदवाराला उमेदवारी द्यावी असे पत्र संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दिले असेल तर, त्या पात्र उमेदवारास त्या पक्षाची उमेदवारी देण्यात येईल. जर असे पत्र दिले नसेल तर ज्या उमेदवाराने सर्वप्रथम उमेदवारी अर्ज दाखल केला असेल त्यालाच पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून मान्यता देणेत येईल. (क्रमांक रानिआ/मनपा/2006/प्र.क्र.19/का.5 दिनांक 6 जानेवारी 2007)

5) आघाड्या / फ्रंट यांना मुक्त चिन्हांपैकी अग्रक्रमाने मागणी केलेले चिन्हे देण्यासाठी विचार करावयाचा आहे. परंतू असे चिन्ह एकापेक्षा जास्त आघाडी / संघटना / फ्रंट यांनी प्रथम अग्रक्रमाने मागितलेले असल्यास चिठ्ठ्या टाकून सदर चिन्ह कोणास द्यावयाचे हे ठरविणेत येईल. चिन्ह वाटपामध्ये अपक्षांच्या वरती प्राधान्य मिळू शकेल.

6) मान्यताप्राप्त राजकीय पक्ष, संघटना, फ्रंट, आघाड्या यांची वर नमूद केलेप्रमाणे परिशिष्ठ-1 व परिशिष्ठ-2 नुसार विहीत नमुन्यातील लेखी पत्रे मुदतीत सूचना प्राप्त न झालेस संबंधित उमेदवारास मुक्त चिन्हांतून निवडणूक चिन्ह दिले जाईल.

7) वरीलप्रमाणे मुक्त चिन्हांपैकी वाटप झालेनंतर उर्वरीत चिन्हे ही अपक्ष उमेदवारांना त्यांनी दिलेल्या अग्रक्रमाचा विचार करुन देण्यात येतील.

8)निवडणूक चिन्हाची मागणी नामनिर्देशन पत्रामध्ये न दिल्यास उमेदवारास द्यावयाच्या निवडणूक चिन्हांबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी एकतर्फी निर्णय घेतील. त्याकामी नंतर त्यांची कोणत्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

9)उमेदवारास कोणते निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे. त्याबाबतचा लेखी निर्णय संबंधित उमेदवारांना कळविणेत येईल.

**५) नामनिर्देशनपत्रांची छाननी :-**

नामनिर्देशनपत्राची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्राची छाननी करणेसाठी निश्चित केलेल्या दिवशी सकाळी 11.00 ते सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी पूर्ण होईपर्यंत केली जाईल. सदर दिवशी संबंधित उमेदवार, एक प्रस्तावक आणि रीतसर प्राधिकृत केलेला एक प्रतिनिधी यांनाच फक्त त्याठिकाणी उपस्थित राहता येईल.

- एकाच प्रभागातील एकापेक्षा अधिक जागांवर नामनिर्देशनपत्रे दाखल केल्यास त्यापैकी कोणत्या जागेची निवडणूक लढवावयाची आहे त्याची उमेदवाराने लेखी सुचना देणे आवश्यक आहे. अशी लेखी सुचना न दिल्यास प्रथम प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेणेत येईल.

**६) दाखल केलेले नामनिर्देशनपत्र / उमेदवारी मागे घेणे :-**

- ज्या उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे वैध ठरविली आहेत. त्यांना त्यांची उमेदवारी मागे घ्यावयाची झाल्यास उमेदवारी मागे घेणेकामी विहित नमुनातील अर्ज भरुन तो संबंधित प्रभागाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करावा.
- मात्र उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिवशीचे वेळेनंतर येणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.
- उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज एकदा दाखल केल्यानंतर तो कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास मागे घेता येणार नाही.
- उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाव्दारे भरावयाचे नाहीत अथवा ई-मेलव्दारे देता येणार नाहीत.

**७) प्रचार :-**

- निवडणूक प्रचार काळामध्ये सकाळी 6.00 ते रात्री 10.00 वाजेपर्यंत उमेदवारांना ध्वनीक्षेपकाचा वापर करता येईल.
- प्रचार फेरी किंवा प्रचार मिरवणूकीत महानगरपालिका क्षेत्रांमध्ये जास्तीत जास्त दहा वाहनांचा समावेश करण्यात येईल. ही प्रचार फेरी अथवा मिरवणूक जर एकाच उमेदवाराची असेल तर त्या उमेदवाराने त्या प्रचार फेरीचा येणारा खर्च आपल्या खर्चात समाविष्ठ केला पाहिजे.
- जर प्रचार फेरी पक्षातर्फे अथवा आघाडीतर्फे काढण्यात आली असेल तर ती प्रचार फेरी अथवा मिरवणूक ज्या प्रभागांमधून जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च विभागून दाखविण्यात येईल.
- निवडणूकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवाराने / राजकीय पक्षाने / राजकीय आघाडीने / संघटनांनी निवडणूकीसाठी ठरविणेत आलेल्या मतदानाच्या दिनांकाचे दिवशी मतदान संपण्याचे वेळेचे अगोदर 48 तास (दोन दिवस) म्हणजेच दिनांक 13/01/2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता प्रचार थांबविणे अत्यावश्यक राहील.

**८) मतदानाची पध्दत :-**

अ) मतदान गुप्त पध्दतीने मतदाराने समक्ष हजर राहून करावयाचे आहे.

ब) मतदारास त्याचे प्रतिनिधीद्वारा (प्रॉक्झीद्वारा) मतदान करता येणार नाही.

क) मतदानाचे दिवशी निवडणूक आयोगाने ठरवुन दिलेल्या दिवशी मतदान अखंडपणे चालू राहील.

ड) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मते नोंदविणेचे असून एका जागेसाठी त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही एकाच उमेदवारांचे नावापुढे व चिन्हांपुढील मत नोंदविणेसाठी राखून ठेवलेले बटन दाबून मत नोंदवू शकेल.

इ) मतदानाचे दिवशी मतदान संपण्याचे वेळी मतदान केंद्रासमोर रांगेत उभ्या असलेल्या शेवटच्या व्यक्तींपासून पहिल्या व्यक्तीपर्यंत मतदान केंद्राध्यक्ष आपली स्वाक्षरी करुन क्रमांक घालून चिठ्ठ्या

देतील. मतदानाची विहीत वेळ संपल्यानंतरही परंतु वेळे अगोदर रांगेत असणाऱ्या अशा सर्व मतदारांना मतदान करता येईल.

प) मतदान केंद्राबाहेर वयोवृद्ध व्यक्ती, अंध-अपंग मतदार व त्याचा सोबती, गरोदर स्त्रीया, अथवा तान्ह्या मुलांसह असणाऱ्या स्त्रीया अशा मतदारांना प्राधान्याने मतदान करण्याची संधी देण्यात येईल. (रानिआ यांचेकडील आदेश क्र रानिआ/मनपा-2011/प्रक्र20/का-5, दि. 05 डिसेंबर 2011)

**९) मतदान प्रतिनिधी नेमणूक: -**

1) उमेदवारांना प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक याप्रमाणे मतदान प्रतिनिधी नेमता येईल. मतदान प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी नेमणूकीबाबतचे अर्जाचे नमुने निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामधून उपलब्ध करून घेता येतील.

मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्त करावयाचे व्यक्तीविरुध्द गुन्हेगारीची नोंद असेल किंवा निवडणूकविषयी गैरव्यवहारात समाविष्ठ असल्याची पूर्वीची नोंद असेल किंवा त्यांच्या वर्तणूकीमुळे मतदारांमध्ये दहशत पसरु शकेल अशा व्यक्तींना मतदान प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये.

2) उमेदवारास त्याचे स्वतःचे ओळखपत्र, त्याचे प्रतिनिधीचे ओळखपत्र तसेच मतदान प्रतिनिधींचे व मतमोजणी प्रतिनिधींची ओळखपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून दिली जातील. उमेदवार यांनी आपले व आपल्या सर्व प्रतिनिधीचे यांचे फोटो अशा नेमणूकीसाठी करावयाचे अर्जासोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालमध्ये मतदान दिनांकाचे किमान आठ दिवस आगोदर दिले पाहिजेत म्हणजे त्यानुसार ओळखपत्रे देणे सोईचे होईल. मतदानाचे दिवसाचे किमान 1 दिवस अगोदर नेमणूक पत्रे (ओळखपत्रे )घेतली पाहीजेत.

3) मतदान प्रतिनिधींची ओळखपत्रे संबंधीत मतदान केंद्रावर त्यांना दिलेली नेमणूक पत्रे हजर केलेनंतरच मतदान केंद्राध्यक्षांकडून देण्यात येतील. ओळखपत्र हरविल्यास अगर गहाळ केल्यास दुसरे ओळखपत्र देण्यात येणार नाहीत व संबंधित प्रतिनिधीस मतदान केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. ज्या मतदान केंद्रासाठी ओळखपत्र व नेमणूकपत्र दिले आहे त्याच मतदान केंद्रासाठी वापरता येईल.मतमोजणी प्रतिनिधींना ओळखपत्राशिवाय मतमोजणी केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. अथवा इतर मतमोजणी केंद्रावर फिरु दिले जाणार नाही. पुरुष व स्त्री मतदारांसाठी मतदान केंद्रावर एकत्रच मतदानाची व्यवस्था केली आहे.

**4) (अ) नकली (डमी) मतपत्रिका**

उमेदवारांनी नकली (डमी) मतपत्रिका आपल्या मतदारांना माहिती देण्यासाठी छापण्यास हरकत नाही. तथापि, सदर मतपत्रिकेवर त्यांनी स्वतःचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह इतकीच माहिती त्यावर छापावी. अन्य कोणत्याही उमेदवाराचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह नकली मतपत्रिकेवर छापण्यात येऊ नये. अशी दुसर्‍या उमेदवाराचे नाव छापलेली मतपत्रिका आढळून आल्यास त्या जप्त करुन संबंधिताविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

**मतपत्रिकेवरील मतपत्रिकेचा रंग :-**

प्रभाग क्र. ०१ ते ३८ प्रत्येक प्रभागातील

१. **"अ"** जागेची मतपत्रिका – **पांढरा रंग.**
२. **"ब"** जागेची मतपत्रिका – **फिका गुलाबी रंग.**
३. **"क"** जागेची मतपत्रिका – **फिका पिवळा रंग.**
४. **"ड"** जागेची मतपत्रिका – **फिका निळा रंग (प्रभाग क्र.३८ वगळून)**

या रंगाची मतपत्रिका मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहे. त्याऐवजी दुसऱ्या रंगाची नकली मतपत्रिका छापण्याची परवानगी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून घ्यावी. तसेच सदर मतपत्रिका मतदान केंद्रावर वापरण्यात येणाऱ्या मतपत्रिकेपेक्षा वेगळया आकाराची असावी, जेणेकरुन त्यामधील फरक त्वरीत लक्षात येईल.

**ब) नकली (डमी) बॅलटिंग युनिट**

उमेदवार तसेच राजकीय पक्षांनी नकली (डमी) बॅलेटिंग युनिट तयार करुन घेण्यास हरकत नाही. त्याद्वारे मतदारांना त्याची माहिती देणे सुलभ होईल. मात्र अशी नकली बॅलेटिंग युनिट लाकडी, प्लास्टिक

अथवा प्लायवुडची असावीत व ती अधिकृत बॅलेटिंग युनिटच्या अर्ध्या आकाराची असावीत व त्यास अधिकृत बॅलेटिंग युनिटला असलेला रंग वगळुन अन्य रंगामध्ये ती तयार करण्याची अनुमती देण्यात येईल. सोबत नमुना दिला आहे.

**क) अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी**

राजकीय पक्ष तथा उमेदवारांनी मतदारांना मतदान केंद्र तसेच त्यांचा मतदार यादीतील अनुक्रमांक सापडणे सुलभ व्हावे यासाठी अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी देण्यास हरकत नाही. त्यावर 1) मतदाराचे नाव, 2) प्रभाग क्रमांक ३) अनुक्रमांक ४) मतदान केंद्र क्रमांक ५) मतदान केंद्राचे ठिकाण इत्यादी माहिती छापण्यास हरकत नाही. सदरची चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी. मात्र त्यावर कोणत्याही राजकीय पक्ष, उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक चिन्ह छापता कामा नये. तसेच त्यावर कोणतीही घोषणा अथवा कोणत्या उमेदवारास मत देण्याबाबतचे आवाहन छापता कामा नये. अशी उमेदवाराचे/पक्षाचे निवडणूक चिन्ह यांची छपाई केलेली ओळख चिठ्ठी मतदान केंद्रापासून 100 मीटर अंतराच्या आत कोणतीही व्यक्ती वाटताना आढळून आल्यास सदर व्यक्तींवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**१०) मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची तयारी :-**

**अ) मतदान यंत्रे तयार करताना उमेदवारांनी अगर त्यांचे प्रतिनिधींनी हजर रहाणेबाबत.**

मतदानाच्या तारखेपूर्वी साधारणत: एक आठवडा अगोदर मतदान यंत्रे तयार (Set and Seal) करता येतील. मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करण्याच्या तारखेपूर्वी उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना मतदान यंत्रे मतदानासाठी किती तारखेस कोणत्या वेळी व कोणत्या ठिकाणी तयार करण्यात येणार आहेत, याबाबतची लेखी सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून देणेत येईल. त्यावेळी हजर रहाणे आवश्यक आहे. उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर असल्यास अथवा कोणीही हजर नसल्यास निवडणूक निर्णय अधिकारी काम सुरु ठेवतील. उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी उपस्थित राहिल्यास मतदान यंत्रे मतदानासाठी कशा प्रकारे तयार करण्यात येतात हे त्यांना समजावून सांगणेत येईल. तसेच त्यांना कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट तयार करतेवेळी त्याचे निरीक्षण करण्याची संधी देणेत येईल. त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्यास त्यांना पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर आपली सही करण्याची अनुमती देण्यात येईल.

ब) मतदानासाठी तयार करण्यात आलेली सर्व मतदान यंत्रे राखीव मतदान यंत्रांसह स्ट्राँग रुममध्ये सुरक्षित ठेवण्यात येतील. मतदान यंत्रे सुरक्षित ठेवलेली खोली (स्ट्राँग रुम) मतदान केंद्रावर यंत्रे देण्याच्या दिवशीच उघडण्यात येईल. ही खोली उघडण्याबाबतच्या लेखी सुचना, तारीख व वेळेसह निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना पाठविण्यात येईल. काही आकस्मिक व न टाळता येणाऱ्या कारणांमुळे स्ट्राँग रुम नियोजित वेळेच्या व तारखेच्या आधी उघडणे भाग पडल्यास उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीतच सदर खोली उघडणेत येईल.

क) मतदान केंद्रावर मतदानाच्या दिवशी सकाळी 6.30 वाजता मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र तयार ठेवण्याचे काम सुरु होईल. उमेदवार स्वतः अथवा त्याचे अधिकृत प्रतिनिधी यांनी संबंधित मतदान केंद्रावर मतदानाचे दिवशी सकाळी 6.30 वाजताचे पूर्वी उपस्थित रहावे. म्हणजे उमेदवार अथवा त्याचे मतदान प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत ठिक सकाळी 6.30 वाजता तेथील मतदान केंद्राध्यक्ष इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतदानासाठी तयार ठेवण्याची तजवीज करतील. उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी वरीलप्रमाणे वेळेवर उपस्थित न राहिल्यास त्यांच्या अनुपस्थितीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मोहोर (सिलबंद) केले जाईल व त्यानंतर त्याबाबत उमेदवार व त्यांचे मतदान प्रतिनिधी यांची कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच त्यादिवशी सायंकाळी मतदान संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मोहोर (सिलबंद) करण्याच्या वेळीही उमेदवार स्वतः अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे. अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मोहोर (सिलबंद) केले जाईल व त्याकामी नंतर कोणतीही तक्रार

विचारात घेतली जाणार नाही. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर लावल्या जाणाऱ्या मोहोरेवर व संवैधानिक पाकीटांवर हजर असणाऱ्या उमेदवारांनी अगर त्यांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या कराव्यात.

**११) मतदान केंद्रातील प्रवेश इत्यादीबाबत.**

मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी व वेळेत संबंधित उमेदवार, त्यांचे अधिकृत मतदान प्रतिनिधी यांना बिल्ले लावून हजर राहता येईल. सदर मतदान केंद्राच्या ठिकाणापासून 100 मीटरच्या अंतरावर बाजूनी रस्त्यावर पांढरे पट्टे ओढण्यात येणार आहेत. सदर शंभर मीटरच्या आतमधील मतदान केंद्राच्या क्षेत्रातील सार्वजनिक जागेवर अथवा खाजगी जागेवर कोणत्याही उमेदवारास व प्रतिनिधीस अथवा कोणासही आपले बुथ उभारता येणार नाहीत, अथवा कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करता येणार नाही. तसेच सदर परीसरात कोणासही राजकीय वा इतर पक्षांची चिन्हे असलेले बिल्ले अथवा पत्रके इत्यादी आणता येणार नाही. तसेच उमेदवारास अगर त्यांचे प्रतिनिधीस खालील पैकी कोणत्याही गोष्टी करता येणार नाहीत.

1) मतासाठी प्रचार अगर मतदारास स्वतःची ओळख करुन देणे.
2) एखाद्या मतदाराचे मत मिळविणे अगर
3) कोणाही विवक्षित उमेदवारास मत न देण्याबाबत मतदाराचे मन वळविणे अगर
4) निवडणूकीमध्ये मत न देण्याबाबत मतदाराचे मन वळविणे अगर
5) निवडणूकी संबंधित जाहिराती अगर भित्तीपत्रके लावणे व निवडणूक चिन्हांची मोठ्या प्रमाणात प्रतिकृती करुन ती मिरविणे.
6) उमेदवार अगर उमेदवार प्रतिनिधीनी मतदान केंद्रात थांबू नये.
7) मतदान केंद्रावर नेमणेत येणाऱ्या मतदान प्रतिनिधींनी मोबाईल फोन सोबत आणू नयेत व मतदारांनी आपले फोन बंद ठेवावेत.
8) संबंधित उमेदवारांनी मतदार आणण्यासाठी भाडोत्री व खाजगी वाहनांचा वापर करणे, मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी लाऊडस्पिकरवरुन प्रचार करणे, मतदान केंद्रावर मतदानासाठी येणाऱ्या मतदारांना अडथळा करणे, अथवा मतपत्रिका, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे हलविणे अथवा त्यांची खराबी करणे, आदी निवडणूकीतील गैर प्रकारची कृत्ये समजली जातील अशी कृत्ये टाळावीत.

**१२) आक्षेपित मते :-** एखाद्या मतदाराबाबत आक्षेप घेणे असल्यास त्याकामी मतदान केंद्राध्यक्षाकडे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन भरुन त्यासोबत अशा प्रत्येक मतदारासाठी रक्कम रुपये 20/- इतकी अनामत रक्कम भरावी लागेल. त्याशिवाय आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. आक्षेप खोडसाळपणाने व मतदानाच्या कामात अडथळा आणण्याच्या हेतूने घेतला आहे असे मतदान केंद्राध्यक्ष यांना वाटल्यास किंवा आढळून आल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल. याशिवाय अशा व्यक्तिविरुध्द अन्य कायदेशीर कारवाई केली जाईल.

**१३) मतदाराची ओळख पटण्यासाठी :**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील दिनांक १४ जुलै २०२५ चे आदेशान्वये मतदाराने मतदान केंद्राध्याक्षास आपली ओळख पटविण्याकरीता प्रथम फोटो असलेले निवडणूक ओळखपत्र सादर करावे. असे ओळखपत्र मतदाराकडे उपलब्ध नसल्यास किंवा त्यावरुन मतदाराची ओळख पटत नसल्यास अशा मतदारांनी आपली ओळख पटविण्यासाठी खालील पुराव्यापैकी कोणताही पुरावा (कागदपत्र) दाखविल्यास मतदान केंद्र अधिकाऱ्याने त्यांना मतदान करु द्यावे.

**मतदाराची ओळख पटण्यासाठी-**

१.भारताचा पासपोर्ट
२.आधार ओळखपत्र
३.वाहन चालविन्याचा परवाना
४.आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र
५.केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहीत दिलेली ओळखपत्रे

६.राष्ट्रियकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधिल खातेदारांचे फोटो असलेले पास बुक.
७.सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले फोटोसहित अपंगत्वाचा दाखला
८.राष्ट्रिय ग्रामीण रेजगार हमी योजनेखालील, फोटो असलेले ओळखपत्र (MNREGA जॉब कार्ड)
९.निवृत्त कर्मचाऱ्याची अथवा त्यांच्या विधवा / अवलंबित व्यक्ती यांची फोटो असलेली निवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे उदा. पासबुक, प्रमाणपत्र इ.
१०.लोकसभा / राज्यसभा सचिवालय तसेच विधानसभा / विधानपरिषद सचिवालय यांनी आपल्या सदस्यांना दिलेले अधिकृत ओळखपत्र
११.स्वातंत्र्य सैनिकांचे फोटो असलेले ओळखपत्र
१२.केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड

**१४) मतमोजणी :-**

1. उमेदवारांना मोजणीसाठी निश्चित केलेले ठिकाण, दिनांक व वेळ तसेच मतमोजणीची व्यवस्था कशी करण्यात आली आहे. याबाबत उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविणेत येईल.
2. सदरच्या मतमोजणीच्या वेळी उमेदवार स्वतः आणि त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी यांना मतमोजणी टेबलच्या संख्येप्रमाणे हजर राहता येईल. मतमोजणीचे वेळी त्यांना देण्यात आलेली ओळखपत्रे छातीवर दिसतील अशा तऱ्हेने लावणे जरुरीचे आहे. अशी ओळखपत्रे नसतील तर संबंधित व्यक्तींना मतमोजणी केंद्राच्या बाहेर काढण्यात येईल.
3. निवडणूक नियम क्र.35 नुसार प्रभागातील एकूण इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मतदान केंद्राप्रमाणे मतमोजणीसाठी घेण्यात येतील व मतमोजणी पूर्ण केली जाईल.

**१५) निवडणूक विषयक खर्चाचा हिशोब :-**

महापालिका निवडणूकीसाठी प्रत्येक उमेदवारास रुपये १५,००,०००/- खर्चाची मर्यादा घालून दिलेली आहे. उमेदवाराने स्वतंत्र बँक खाते उघडून त्या खात्यावरच निवडणूक खर्च करावयाचा आहे. संबंधित उमेदवार यांनी निवडणूकीच्या खर्चाची भाग-1 व जोडपत्र-2 व जोडपत्र -2ब, (शपथपत्राचा नमुना) खर्चाचा तपशिल दर्शविणारा तक्ता पुरविणेत आला आहे.

तसेच निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर 30 दिवसांचे आत नोंदवही मधील खर्चाची संपूर्ण माहिती मा.आयुक्त यांना भाग-1 मध्ये जोडपत्र-2 ब, (शपथपत्रासह) सादर करणेची आहे. याप्रमाणे विवरणपत्र देण्यात कसूर झाल्यास नियमानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

**१६) राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चाबाबत:-**

स्थानिक स्वराज्य संस्थामधील निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांमार्फत जो खर्च करण्यात येतो तो त्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये त्या पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांमध्ये कोणकोणत्या प्रमाणात वाटून दाखविण्यात यावा ते संबधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवावे.

**सर्व पक्षांवर राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिअ/नप-2016/प्र.क्र.31/का-6 दिनांक 14/10/2016 अनुसार सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.**

अ) राजकीय पक्षांनी त्यांचे महत्वाचे पुढारी (Star Campaigners) यांची यादी महापालिका आयुक्तांकडे सादर करावी. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना अमान्यप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्षांना ४० महत्वाचे राजकीय पुढारी यांची यादी सादर करता येईल. उपरोक्त पुढाऱ्यांचा प्रचाराकरीता होणाऱ्या प्रवास खर्च संबंधीत उमेदवाराच्या निवडणूक खर्चामधून वगळणेत येईल.

ब) कोणत्याही उमेदवारास स्वतःच्या प्रभागामध्ये स्वतःचे नाव महत्वाचा राजकीय पुढारी म्हणून घोषीत करता येणार नाही.

**१७) स्वच्छता राखण्यासाठी भिंतीवर जाहिराती न लावणे :-**

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने अगर त्याच्या वतीने कोणाही व्यक्तीने संबंधीत मिळकतीच्या मालकाची किंवा शासनाची किंवा स्थानिक संस्थांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणताही बोर्ड अथवा प्रचाराच्या जाहिराती लावू नयेत.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने अगर त्याच्या वतीने अन्य कोणाही व्यक्तिंनी कोणतीही खाजगी मालकीची जागा, इमारत, स्मारके, पुतळयाचे चौथरे, भिंती कुंपणे, वृक्ष अथवा सार्वजनिक वापराच्या जागांचे विद्रुपीकरण होईल अशा रितीने निवडणूक प्रचार विषयक पत्रके, जाहिराती कापडी फलक, भित्तीपत्रके वगैरे लावू नयेत.

**१८) प्रचाराच्या जाहिराती प्रसिध्दीबाबत :-**

- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या सर्वसाधारण अगर विशेष लेखी परवानगीशिवाय कोणताही पक्ष /आघाडी/फ्रंट किंवा इतर कोणतीही संघटना, संस्था अगर व्यक्ती यांनी कट आऊटस्, जाहिरात फलक, कापडी फलक इत्यादी लावू नयेत.
- निवडणूकीच्या प्रचारामध्ये प्राण्यांचा वापर करता येणार नाही.
- मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध या कायद्यांतर्गत निवडणूकीसंबंधी फ्लेक्सबोर्ड लावावयाचे झाल्यास महानगरपालिकेची परवानगी घ्यावी लागेल. अशी परवानगी निवडणूकीचा प्रचार कालावधी संपतो तिथपर्यंतच देणेत येईल. त्यामुळे सर्व उमेदवारांनी आपले फ्लेक्सबोर्ड निवडणूकीचा कालावधी संपण्यापूर्वी 48 तास आधी काढून घ्यावेत. फ्लेक्सबोर्ड काढणेची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही याची नोंद घ्यावी.
- इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमातून जाहिराती, मुलाखती प्रसिद्ध केल्यास त्याचा खर्च संबंधीत उमेदवाराचे खर्चात समाविष्ठ करणेत यावा.

**१९) आचारसंहिता :-**

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील **आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७ दिनांक ०४/११/२०२५** अन्वये राजकीय पक्ष व उमेदवारांकरीता सर्वसाधारण सुचना, कायदेविषयक तरतुदी व आदर्श आचारसंहिता पुस्तिका उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**टिप** : -

- **वरील सुचना केवळ मार्गदर्शक स्वरुपाच्या आहेत, उमेदवारांनी मा.राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसुचना, आदेश व उमेदवार हँन्डबुक याचा आधार घ्यावा. निवडणुक प्रक्रिये संबधातिल सर्व बाबींमध्ये आयोग व निवडणूक निर्णय अधिकारी यांचे सुचनाच अंतिम व बंधनकारक राहतील. या मार्गदर्शक व अधिकृत आदेशांमध्ये फरक आढळल्यास, अधिकृत आदेशांना प्राधान्य राहील.**

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई ३२,
यांचेकडील आदेशानुसार

राजकीय पक्ष व उमेदवार यांचेकरीता मार्गदर्शन पुस्तीका

## आदर्श आचारसंहिता

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
सार्वत्रिक निवडणुका-२०२५
आदर्श आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
ई मेल - sec.zpps@mah.gov.in
दि. ०४ नोव्हेंबर, २०२५

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ नप-२०१६/
प्र.क्र.३१/का-६, दि. १४ ऑक्टोबर, २०१६.

ज्याअर्थी, भारतीय संविधानामध्ये झालेल्या दुरुस्तीनुसार प्रत्येक राज्यात अनुच्छेद २४३-के व अनुच्छेद २४३-झेडए नुसार राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली असून राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.५७५६/२००५ (श्री. किशनसिंग तोमर विरुध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) या याचिकेमध्ये दि.१९/१०/२००६ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोग यांचे अधिकार, शक्ती व दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या समकक्ष आहेत.

२. ज्याअर्थी, पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक-२७०/१९९७ श्री. हरबन्सलाल जलाल विरुध्द भारत सरकार, भारत निवडणूक आयोग व इतर या दाव्यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार निवडणूक आयोगाला निवडणुका मोकळ्या वातावरणात व योग्यरितीने व्हाव्यात यासाठी निवडणुकीची अधिसूचना निघण्याच्या पूर्वीपासून आदर्श आचारसंहिता लावण्याचे अधिकार

आहेत व तिचे पालन सर्व राजकीय पक्षांनी करणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पेशन लिव्ह पिटिशन (सिव्हील) क्रमांक- २२७२४/१९९७ यामध्ये भारत सरकार व भारत निवडणूक आयोग यांच्यामध्ये दि.- १६ एप्रिल, २००१ रोजी झालेल्या करारानुसार पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक- २७०/१९९७ मध्ये दिलेल्या आदेशांबाबत पुढे काही आदेश देण्याची आवश्यकता नाही, असे म्हटले आहे.

३. ज्याअर्थी, लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक होणे आवश्यक असल्याने राज्य निवडणूक आयोगाने लोकसभा व विधानसभेसाठी वापरण्यात येणारी आदर्श आचारसंहिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीसुध्दा स्वीकारलेली आहे. याकरिता राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेले सर्व आदेश एकत्रित करून आदेश क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का-६, दि. १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित केले होते.

४. ज्याअर्थी, २०१६ पासून झालेल्या नवीन घडामोडी, भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले नवीन आदेश, इत्यादी या सर्व बाबींचा विचार करून वर नमूद दि. १४ ऑक्टोबर, २०१६ चे आदेश रद्द करुन आदर्श आचारसंहितेबाबत सुधारित आदेश काढणे आवश्यक झाले आहे.

५. त्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आचारसंहितेची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा ५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए (४) अनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वच्छ,

पारदर्शक, मोकळ्या व भयमुक्त वातावरणात व्हाव्यात यासाठी यापूर्वीचे दि. १४ ऑक्टोबर, २०१६ रोजीचे आदेश अधिक्रमित करून पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

१) आदर्श आचारसंहितेचा उद्देश -

आचारसंहितेचे तत्व आणि ती लागू करण्याबाबतचा उद्देश खालीलप्रमाणे आहे:-

(i) शांततापूर्ण आणि नियमबध्द आचरण (Peaceful and orderly conduct)

(ii) समान संधी (Equal opportunity)

(iii) नागरिकांचा शांततेचा अधिकार (Right of citizens to peace)

(iv) प्रचाराकरिता पाळावयाची सभ्यता (Decorum in campaign)

(v) निवडणुकीमधील भ्रष्ट आचरण आणि निवडणूक विषयक गुन्हे प्रतिबंधित करणे (Preventing corrupt practices and electoral offences)

(vi) शासकिय यंत्रणा आणि पदाचा दुरुपयोग यावर प्रतिबंध ( Preventing misuse of government machinery and position of power)

(vii) आचारसंहिता आणि शासन ( MCC and Government )

सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील याकरिता निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी/कर्मचारी यांनीही कोणताही पक्ष व उमेदवार यांची बाजू न घेता (प्रामुख्याने सत्तेमध्ये असलेल्या पक्षांबाबत) नि:पक्षपणे व नियमाप्रमाणे कामे करावीत. तसेच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देणाऱ्या सर्व योजना किंवा कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावेत.

२) आचारसंहितेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी-

आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीची जबाबदारी नगरपरिषद/नगरपंचायती, जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायतींकरिता संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिकांकरिता संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची राहील.

जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी आचारसंहितेचे आदेश लक्षात घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी. ज्या बाबींच्या संदर्भात स्पष्टता नसेल अशा बाबींच्या संदर्भात लोकसभा व विधानसभा निवडणुकांबाबत भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचना विचारात घ्याव्यात. तसेच जर भारत निवडणूक आयोगाच्या सूचना उपलब्ध नसतील तर राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन मागवावे.

या आदेशात आचारसंहितेसंदर्भात विविध विषयांबाबत दिलेले निदेशांचे संकलन हे सर्वसमावेशक नाही. राज्य निवडणूक आयोगाने कायदा व सुव्यवस्थेबाबत क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४१/का.७, दि.०४/११/२०२५ अन्वये एकत्रित आदेश दिलेले आहेत. या आदेशांच्या अनुषंगाने आचारसंहितेची अंमलबजावणी योग्यरितीने करण्यात येईल याबाबत दक्षता घ्यावी. निवडणुकीच्या प्रक्रीयेमध्ये या आदेशात उदाहरणादाखल दिलेल्या संकलनामध्ये नमूद नसलेली कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाले असेल तर जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व निवडणुकीशी निगडीत संबंधित अधिकाऱ्यांनी राजकीय पक्ष/उमेदवार/अधिकारी-कर्मचारी व इतर यांच्याविरुध्द तातडीने खालील प्रमाणे कार्यवाही करावी :-

(अ) आदर्श आचारसंहितेअंतर्गत संबंधितांना Reprimand, Censure, Condemnation करावे व आवश्यक तेथे संबंधितांना निर्देश किंवा मार्गदर्शन द्यावे.

(ब) निवडणूकविषयक कायदा व तरतुदीअंतर्गत संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करावेत.

(क) अस्तित्वात असलेल्या इतर कायद्यांतर्गत उदा. भारतीय न्याय संहिता, २०२३; सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम, १९८४; महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंधक अधिनियम, १९९५; प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० इत्यादी अन्वये गुन्हे दाखल करावेत.

निवडणूक ही एक कालबध्द प्रक्रिया आहे, ज्यामध्ये अनेक घडामोडी घडत राहतात. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यावर त्याबाबत अत्यंत तातडीने कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

३) आदेश अंमलात येण्याचा दिनांक -

हे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजेच, महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायती, जिल्हा परिषद/पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या या आदेशाच्या दिनांकानंतर होणाऱ्या सर्व निवडणुकांसाठी लागू होतील.

४) आचारसंहितेचे क्षेत्र -

सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी लागू राहील व पोटनिवडणुकीची आचारसंहिता संबंधित प्रभाग किंवा संबंधित निवडणूक विभाग किंवा संबंधित निर्वाचक गण यांच्यापुरतीच लागू असेल.

आचारसंहिता जरी निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रापुरती लागू होणार असली तरी त्या बाहेरील आजूबाजूच्या क्षेत्रात घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमामुळे मतदारांवर प्रभाव पडून सदर निवडणुकीवर परिणाम होऊ शकेल, असे कार्यक्रम आयोजित करता येणार नाहीत. उदा. जिल्हा परिषदेची जर निवडणूक असेल तर जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी जरी ते मुख्यालय ग्रामीण क्षेत्रात समाविष्ट होत नसले तरीही तेथे निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांवर प्रभाव पडेल असा कार्यक्रम आयोजित करता येणार नाही. तसेच महानगरपालिका अथवा नगर परिषद / नगरपंचायत क्षेत्रात निवडणूक असताना त्याला लगतच्या ग्रामीण क्षेत्रात असा कार्यक्रम किंवा अशी कृती करता येणार नाही ज्यामुळे महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या निवडणूका/मतदारावर परिणाम होईल. त्याशिवाय, संपूर्ण राज्यामध्ये आचारसंहितेच्या कालावधीत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारांवर प्रभाव पडेल असा कार्यक्रम आयोजित करता येणार नाही.

५) आचारसंहितेचा कालावधी -

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घोषित केल्याची वेळ व दिनांकापासून ते मतमोजणीच्या निकालापर्यंत लागू राहील. या आचारसंहितेचे सर्वसाधारणपणे दोन टप्पे असतील.

